


---------------------------------------------------------------------------------------------

**कोरडवाहू बळीराजा बनला उद्योजक**
***दालमिलचा व्यवसाय ठरला प्रगतीचा मार्ग**
***बळीराजा चेतना अभियानाचे चेतनादूत म्हणून करतोय काम**

नेमकं ध्येय डोळयासमोर ठेवन रस्ता पकडला, जिद्द, चिकाटी त्यासोबतच कामांचे आखणी, कष्ट केल्यास यश फार दूर राहत नाही. शिक्षकिपेशाचा पूर्वानुभव पाठीशी असल्याने विद्यार्थ्यांना ज्या पध्दतीने अभ्यास करून शिकविले जाते. त्याच पध्दतीने पीक आणि दालमिल उद्योग व्यवस्थापनाचा अभ्यास करून आपल्या जीवनात बदल घडविला. आणि कोरडवाहू शेतकरी माधव राउत हा आज दालमिल व्यवसायातून उद्योजक बनला. इतकेच नव्हेतर गावातील इतर शेतक-यांची साथ घेउन पैंगनंगा ॲग्रोप्रोडयूसर कंपनी काढण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविले. आणि आता बळीराजा चेतना अभियानअंतर्गत इतर शेतक-यांना आपल्या शेतातील मालापासून आपनच कसे उद्योजक बनू शकतो यांचे मार्गदर्शन करीत आहे.



यवतमाळ जिल्हयातील आर्णी तालुक्यातील कोससणी घाटवळणावरच अंबोडा हे छोटेसे गावं. येथील पायाने अपंग असलेले माधव लक्ष्मणराव राउत एम.ए, एम.एड, बीपी.एड. शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुरवातील तालुक्यातील कवठा बाजार येथे मुख्याध्यापक म्हणून रूजू झाले. आई उर्मिमला यांनी एकच इच्छा होती अपंगत्वामुळे कुठेही मागे राहायला नको. याच शिकवणीमुळे त्यांना प्रेरणा मिळत गेली. वडीजोपार्जित दहा एकर शेती सांभाळीत काही काळ नोकरीही सांभाळली. मात्र, उराशी स्वप्न बाळगून होते उद्योजक बनण्याचे. याला साथ मिळाली ती पत्नी रेणुका यांची आणि याच स्पप्नासाठी त्यांनी आपल्या नोकरीला पूर्णविराम दिला.

**कोरडवाहू शेतीचा मिळाला आधार**



वडीलोपार्जित दहा एकर शेतीमध्ये कापूस, सोयाबीन, तूर या पिकांची लागवड होतीच. मात्र, डोंगराळ भाग असल्याने वन्यप्रान्यांचा हैदोस मोठया प्रमाणात होता. अशातच तूर या पिकांचे चांगले उत्पादन झाले. मात्र, भाव कमि होता. त्यामुळे या पिकाचे काय करावे असा प्रश्न निर्माण झाला. यातून या तूरीपासून डाळीची निर्मिती केल्यास अधिक फायदा होईल असा विचार मनामध्ये आणला आणि दालमिलची संकल्पा उदयास आली.



**दालमिलची उभारणी**

पत्नी रेणुका ही उच्च शिक्षित असल्याने दालमिल सांभाळण्याची सर्व जबाबदारी स्विकारण्याचे ठरविले. आणि येथून दालमिल उभारणीचा शुभारंभ झाला. सुरवातील पंतप्रधान स्वयंरोजगार योजनेतून बँकेकडून १५ लाखंचे कर्ज २००घेउन दालमिलची उभारणी केली. घरच्या शेतामध्ये तूरीची लागवड करून दाळ काढून विक्री करू लागले. पत्नी रेणुका ही 'तुर द्या डाळ घेउन जा' ही बिद्र वाक्यच आपल्या व्यवसायाचे बनविले. शरीलाला डाळ कशी पोषक आहे याची माहिती ती शेतक-यांना देउ लागली. आणि तुरीची आवक वाढू लागली पहिल्यावर्षी तीन लाखांची उलाढाल केली. तर माधव राउत यांनी बाजारात जावून तूर दाळ विक्रीची कला अवगत केली.

**५० स्थानिकांना रोजगार**



दालमिलची उभारणी करण्यात आल्यानंतर याठिकाणी या उद्योगातून गावातील महिला व पुरूषांना दाळ काढणे, कारागीर, त्यावर प्रक्रिया करणे, त्यांना वाळू घालने, दाळ मोजने, त्यांची दोन किलो आणि पाच किलो यांची पॅकेटची पॅकिंग करणे, बाजारात जावून विक्री करणे अशा विविध कामांसाठी गावातीलच ५० स्थानिंकाना रोजगार मिळाला आहे.



**बचत गटांची स्थापना**

गावातील १५ शेतक-यांनी एकत्र येउन धवलक्रांती शेतकरी स्वंय सहायता गटांची स्थापना केली. त्यांनी आपल्या शेतात तूरीची लागवड करून यातून दाळ निर्मीती करण्यास सुरवात केली. मुद्दल वगळता चांगला नफा पदरी पडला. ही दाळ बाजारात परीसरातील बोरगाव, माहूर, आर्णी, हिवरा(संगम) येथे विक्री करण्याचे केंद्र उभारण्यात आले. पत्नी रेणुका ही दाळमिळ सांभाळण्याचे तर माधव राउत हे विक्रिची धुरा सांभाळली.

**पहिल्यावर्षी दहा लाखांचा नफा**



परिसरातील नागरिकांसह दालमिलवर शेतक-यांची तूर खरेदी केली. तसेच शेतक-यांची तूरची डाळ काढून त्यांना विक्रीसाठी सहाय करने सुरू केले. दिवसाला शंभर क्विंटल दाळ काढयात येत असून हंगामात पहिल्याच वर्षी पाच हजार क्विटंल दाळ काढण्यात आली.  यातून दहा लाखांचे उत्पन्न झाले. त्यामुळे आता बचत गटाने पुढच्या हंगामात अधिक जोमाने कामाला लागण्याची जिद्द निर्माण झाली.

**महाराष्ट्रात विक्री**

धवलक्रांती शेतकरी उत्पादक संघाने उत्पादित केलेली दाळ आता परिसरात मागणी वाढू लागली.  तसेच उत्पादनही क्षमता वाढली. त्यामुळे आता ही दाड विक्री करण्याचा प्रश्न निर्माण झाला. कृषी विभागाचे मेळावे, प्रदर्शनी, कार्यशाळा याठिकाणी डाळ नेण्यास सुरवात केली . यातून यवतमाळ, पुणे, नागपूर, अमरावती, माहूर, नांदेड, नाशिक, बुलठाणा, मुंबई याठिकाणावून थेट दुरध्वनीवरून बुकिंग येउ लागले. आणि डाळ हंगामात विक्री होउ लागली.

**पैंगनंगा अॅग्रोप्रोडयूसर कंपनी**

परीसरातील ४५० तूर उत्पादक  शेतकरी एकत्र येउन आता या बचत गटाला कंपीनीचे स्वरूप देण्याचे ठरविले. प्रत्येकी हजार शेअर्स असे ४ लाख ५० हजार रूपये गोळा झाले. यातून पैंगनंगा अॅग्रोप्रोडयूसर कंपनीची स्थापना करण्यात आली. जागतीक बॅंकेकडून १३ लाख ५० हजारांचे कर्ज घेण्यात आले. असे १८ लाख ५० हजार रूपयांतून  धान्य सफाई केंद्र व इतर अध्यावत मशनरिज बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे हंगामातील जानेवारी ते मे पर्यंत ९० लाखांची उलाढाल होणार आहे.

**बचतगटांचा आधार**

बचतगटामध्ये असलेले नीलेश आचमवार, संतोष चौधरी, गजेंद्र भरवडे, बाबाराव आडे, तुकाराम चव्हाण, दुजसिंग जाधव, राजू राउत संजय कासरवार, उमेश आचमवार उमेश आचमवार, विकास खडसे यांनी उभारलेला बचतगटामुळे आता मोठा उद्योग निर्माण झाला आहे.

**व्यवसायाचे वैशिष्टये**

* शेतकरी ते ग्राहक थेट सुविधा
*आरोग्याच्या दृष्टीने पोषक डाळ
*नैसर्गिक पध्दतीने सुर्यकिरणावर सुकविलेली दाळ

**शेतक-यांनो व्यवसायाकडे वळा**

शेतक-यांनी पारंपारीक शेती सोबत आता आधुणिकतेची कास धरली आहे. मात्र आता आपल्या शेतात पिकवीलेल्या शेतपिकांची विक्री स्वतःहा करण्यासाठी उद्योगाकडे वळले पाहिजे. आणि याचसाठी बळीराजा चेतना अभियानातून जिल्हाभरातील शेतक-यांना दाळमिलचे तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी अभियानाचे चेतनादूत म्हणून काम करीत आहे.

**माधव लक्ष्मण राउत**
**रा. अंबोडा, ता. आर्णी, जिल्हा यवतमाळ**
**मो. नंबरः** 9764076152